# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

Office of the Collector and District Magistrate, Mumbai City

## उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मुंबई शहर यांचे कार्यालय

पहिला मजला, डी. डी. बिल्डिंग, ओल्ड कस्टम हाऊस, फोर्ट, मुंबई ४०० ००१

दुरध्वी क्र.०२२-२२६४ १४११ फॅक्स क्र. ०२२-२२६७०६५६

क्र. उ.जि./भू.सं./मुं.श./ सै.बु.अ.ट्र. /६३८/२०१९/

दिनांक :- ३० /०९/२०१९ 15530

प्रति,

मे.सैफी बुरहानी अपलीफ्टमेंट ट्रस्ट,

ईजी हॉल, तळ मजला,

४७/४९ रौदत ताहेरा स्ट्रीट,

भेंडी बाजार मुंबई-४०० ००३

**विषय:- मुंबई शहर**

भुलेश्वर विभागातील भेंडी बाजार पुनर्विकास प्रकल्पासाठी खाजगी जमीन संपादन करणेबाबत.

---

**कलम १९ ची घोषणा नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेबाबत.**

उपरोक्त विषयांकित नमूद प्रकरणी भुलेश्वर विभागातील भेंडी बाजार पुनर्विकास प्रकलपासाठी आपल्या कार्यालयामार्फत प्रप्त २१ प्रस्तावांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ (४) अंतर्गत **भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३** या कायद्यान्वये संपादन करण्यासाठी कलम १९ ची घोषणा आपले कार्यालयीन बोर्डावर व संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी व सदरची घोषणा प्रसिध्द करुन त्याबाबतचा अहवाल पाठविणेत यावा.

सोबत:- कलम १९ च्या घोषणेची प्रत
(मराठी व इंग्रजी)

३०.९.२०१९

संपत डावखर
निवासी उपजिल्हाधिकारी,
मुंबई शहर

E:\SBUT\Section 19\सैफी बुरहानी अपलीफ्टमेंट ट्रस्ट Sec.19 Notification.docx

# जिल्हाधिकारी, मुंबई शहर

## अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३**

क्रमांक-नि.उ.जि./भू.सं/मु.श/सै.बु.अ.ट्रा/प्र.क्र.१/एलएक्यू/एसआर-२०१९/०७

ज्याअर्थी भुलेश्वर विभागातील भेंडी बाजार पुनर्विकास प्रकल्पासाठी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत अभिप्रेत असलेले "सार्वजनिक प्रयोजन" म्हणून समंती न देण्याऱ्या भुधारकांच्या जमिन संपादनास बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली विनियम ३३(९) चे खंड ३ मधील उपखंड ५ मध्ये मान्य करण्यात आले आहे.

ज्याअर्थी, सदर भूसंपादन प्रस्तावातील मिळकत ही उक्त सार्वजनिक प्रयोजनार्थ संपादन करण्यात येत असल्याने सदर प्रस्तावास नगर विकास विभाग मंत्रालय, यांचे कडील पत्र क्र. टिपीबी-४२१५/११६६/प्र.क्र.१८०/२०१५/नवि-११ दिनांक २२/०४/२०१९ अन्वये बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली,विनियम ३३(९) खंड ३ मधील उपखंड ५ मध्ये नागरी नुतनीकरण योजनेंतर्गत प्रकल्प हा "सार्वजनिक प्रयोजन" म्हणून मान्य करण्याची तरतूद असून त्यानुसार सदर प्रकरणी उच्चधिकार समितीने शिफारस केल्यानुसार पुनर्विकासास सहमती देत नसलेल्या जमिन मालकांच्या मोडकळीस आलेल्या इमारती खालील एकूण ४६३७ चौ.मी. जमिनीचे बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील सुधारीत विनियम ३३(९) चे ॲपेडिक्स IIIA चे क्लॉज ३(५) सह क्लॉज २२ शेवटचे परिच्छेद नुसार भूसंपादन करण्याची विनंती अर्जदार ट्रस्टने भूसपादनाचा मोबदला शासनास/भूसंपादन अधिकारी याचेकडे जमा करण्याच्या अटीस अधिन राहून मान्य करण्यात आली असून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम १५१ खालील शासन निर्णय दिनांक २४/०८/२०१५ नुसार सदर भूसंपादनाची कार्यवाही जिल्हाधिकरी, मुंबई शहर यांचेमार्फत करण्याबाबत नगर विकास विभागाचे सदंर्भ क्र. टिपीबी४३१५/११६६/प्र.क्र.१८०/ २०१५/नवि-११ दिनांक ०६/०१/२०१६ अन्वये सूचित करण्यात आले आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाच्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना कलम १५१ पोटकलम (१) खालील काढलेल्या शासन निर्णय क्र. टिपीबी ४३१४/१८१/प्र.क्र.९५/२०१५/नवि-११ दि.२४/०८/२०१५ अन्वये मंजूर नागरी नुतनीकरण योजनेंतर्गत सार्वजनिक प्रयोजनासाठी निर्दिष्टीत करण्यात आलेल्या जमिनीबाबतच्या उक्त अधिनियमाच्या कलम १२६ (२) व (४) खालील भूमीसंपादनाबाबत वापरावयाच्या शासनाच्या शक्ती जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

ज्याअर्थी, उपरोक्त प्रकल्पाचे संपादक संस्था सैफी बुरहानी अपलीफ्टमेंट ट्रस्ट प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन करीता तयार करण्यात आलेल्या धोरणानुसार पुनर्वसन करणार आहेत व त्याकरीता या संपादनाखालील क्षेत्रावरील इमारत उपकर प्राप्त इमारत असल्याने म्हाडामार्फत सर्वेक्षण करुन प्रमाणित पात्रता यादीनुसार पात्र रहिवासी/भाडेकरु/गाळेधारक यांचे कायमस्वरुपी पुनर्वसन याच ठिकाणी करण्यात येईल असे सैफी बुरहानी अपलीफ्टमेंट ट्रस्ट, यांनी त्यांचेकडील क्र.एसबीयुटी/टीएमआर/३८५/२०१९ दिनांक २४/०९/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. प्रकल्पग्रस्तांच्या कायम पुनर्वसन आराखड्याशिवाय त्यांच्या तात्पुरत्या पुनर्वसनासाठी खालीलप्रमाणे मोबदला देखील देण्यात येणार आहे.

१. प्रकल्पग्रस्तांना तात्पुरत्या स्वरुपात निवासी सदनिका/व्यावसायिक गाळे भाडेतत्वावर घेणेकरिता प्रतिवर्षी २४ महिन्याचे भाडे आगाऊ स्वरुपात देण्याची तरतूद करण्यात आली आहे.
२. भेंडी बाजार पुनर्विकास प्रकल्पासाठी देण्यात येणाऱ्या भाड्यामध्ये प्रतिवर्षी ५%/८% वाढ देण्यात येणार आहे.

३. सैफी बुरहानी अपलीफ्टमेंट ट्रस्ट, मार्फत तात्पुरत्या पुनर्वसनाकरीता देण्यात येणाऱ्या अंजीरवाडी येथील निवासी सदनिकांची देखभाल दुरुस्ती (Maintenance) देखील करण्यात येणार असून सदर बोजा प्रकल्पग्रस्तांवर टाकला जाणार नाही.
४. सदर पुनर्वसन धोरण संपादक संस्था सैफी बुरहानी अपलीफ्टमेंट ट्रस्ट, यांचे संकेतस्थळ www.sbut.com वर उपलब्ध आहे.

ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादना पोटी द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम संपूर्णपणे उक्त संपादक संस्था यांनी अदा करावयाची आहे.

ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना (दुसरी दुरुस्ती) अध्यादेश, २०१५ शासन राजपत्र दिनांक २१/०८/२०१५ मध्ये नमूदनुसार प्रादेशिक आराखडा, विकास आराखडा किंवा नगर रचना योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक, आरक्षित अथवा निश्चित केलेल्या जमिनीसाठी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (यापुढे "उक्त संपादन अधिनियम २०१३" म्हणून संबोधिलेला मधील कलम ४ ते १५ मधील नमूद कार्यपध्दती लागू ठरणार नाही.

आणि ज्याअर्थी, भुलेश्वर विभागातील भेंडी बाजार पुर्नविकास प्रकल्पासाठी खालील अनुसूची मधील जमिन सार्वजनिक प्रयोनासाठी आवश्यक असल्याबाबतची जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, शासनाने प्रदान केलेल्या शक्तीनुसार आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम १२६ च्या पोटकलम (४) सह उक्त संपादन अधिनियम २०१३ च्या कलम १९ च्या पोटकलम (१) अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा असे घोषित करतात की, उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत.

आणि उक्त संपादन अधिनियम, २०१३ च्या कलम (३) खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर पहिला मजला जुने जकात घर, फोर्ट, मुंबई-४०० ००१ यांना पदनिर्देशित करीत आहे. संपादनाखालील जमिनीचा प्रकल्प आराखडा/नकाशा पाहण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर पहिला मजला जुने जकात घर, फोर्ट, मुंबई-४०० ००१ ठिकाणी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

**अनुसूची**

**जमिनीचे वर्णन**

**जिल्हा मुंबई शहर**

**जिल्हा-मुंबई शहर** **विभाग-भुलेश्वर**

| अ.क्र. | भूकर क्रमांक | संपादनाखालील जमिनीचे क्षेत्र चौ.मी |
|---|---|---|
| १ | ३६७७ | १४०.४७ |
| २ | ४१७० | ८१.१० |
| ३ | ४१९३ | १२६.०१ |
| ४ | ४२२४ | ८३.६१ |
| ५ | ४२२५ | ११६.२२ |

| | | |
|---|---|---|
| ६ | ४२२६ | ८३.६१ |
| ७ | ४२४० | ९५.९७ |
| ८ | ४२४२ | १०९.५३ |
| ९ | ४२५५ | १६४.७१ |
| १० | ४२६० | १६३.८८ |
| ११ | ४२७० | ७६.९२ |
| १२ | ४२७४ | ३१६.०५ |
| १३ | ४२७९ | ५९४.९५ |
| १४ | ४२९५ | २३६.६२ |
| १५ | ४२९६ | २५९.२० |
| १६ | ४२९७ | १८२.२७ |
| १७ | ४२९९ | २२२.४१ |
| १८ | ४३३७ | ७१.९१ |
| १९ | ४३३८ | ९०.३० |
| २० | ४३३९ | १७८.९३ |
| २१ | १/४२२७ | १५८.०३ |

---

**सार्वजनिक प्रयोजन:- भेंडी बाजार पुनर्विकास प्रकल्पासाठी**

ठिकाण:- मुंबई शहर

दिनांक :- 28/08/2008

शिवाजी जोंधळे,
जिल्हाधिकारी, मुंबई शहर